आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

२३ एप्रिल २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराच्या तोफा उद्या थंडावणार, प्रचार शिगेला

- देशाचं संविधान कोणीही बदलू शकणार नाही, अशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ग्वाही

- नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा प्रधानमंत्री झाले तर भारत जगातली तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता बनेल, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं अकोल्यातल्या प्रचार सभेत प्रतिपादन

- बारामती लोकसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवाराला 'तुतारी' चिन्ह दिल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाची निवडणूक आयोगाकडे तक्रार

**आणि**

- पालघर वगळता उर्वरित कोकणात पुढचे २-३ दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराचा उद्या अंतिम दिवस आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांचे प्रमुख नेते आपापल्या

उमेदवारांसाठी प्रचारसभा, रोड शो आणि मतदारांची प्रत्यक्ष भेट घेऊन पक्षाची भूमिका मांडत आहेत.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राजस्थान आणि छत्तिसगडमधे प्रचारसभा घेतल्या. भाजपा देशाचं संविधान बदलणार असल्याचा किंवा आरक्षण रद्द करणार असल्याचा खोटा प्रचार काँग्रेस करीत असल्याचं त्यानी छत्तीसगडमधे जांजगीर चंपा मतदारसंघातल्या प्रचारसभेत बोलताना सांगितलं. देशाचं संविधान कोणीही बदलू शकणार नाही असं ते म्हणाले. भाजपाचं प्राधान्य गरीब, युवा, महिला आणि शेतकरी या वर्गांना राहील असं सांगून सब का साथ सब का विकास हाच आपल्या पक्षाचा मंत्र राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. महिलांचा शेतीत सहभाग वाढवण्याचा आपला प्रयत्न आहे असंही त्यांनी सांगितलं.

राजस्थानात टोंक-सवाई माधवपूर इथल्या उनियारामध्ये झालेल्या प्रचारसभेत ते म्हणाले की, सुरक्षित राष्ट्र आणि स्थिर सरकार किती महत्त्वाचं आहे, हे राजस्थानच्या लोकांना चांगलंच ठाऊक आहे. वर्ष २०१४ आणि २०१९ मध्ये राजस्थानने एकजूट करून राज्यातल्या सर्व २५ जागांवर भाजपला देशात शक्तिशाली सरकार स्थापन करण्यासाठी आशीर्वाद दिला होता. हीच एकता राजस्थानचं सर्वांत मोठं भांडवल आहे, असं ते म्हणाले.

काँग्रेस पक्षानं सत्ताकाळात घेतलेल्या निर्णयांवर कडाडून टीका करतानाच त्यांनी आपल्या सरकारनं घेतलेल्या लोककल्याणकारी योजनांचा लेखाजोखा मतदारांपुढं मांडला. काँग्रेसच्या दलित आणि अनुसूचित जाती जमातीवर अन्याय करण्याच्या आणि विशिष्ट धर्माचे तुष्टीकरण करण्याच्या प्रयत्नांमुळे समाज धर्माच्या

नावावर विभागला जात होता, ते आता आपले सरकार होऊ देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज अकोला इथं प्रचार सभा घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी विकासाची कावड घेऊन निघाले आहेत. ते तिसऱ्यांदा प्रधानमंत्री झाले तर भारत जगातली तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता बनेल, असं ते या सभेत म्हणाले.

मोदी यांनी गेल्या दहा वर्षात जनतेनं दिलेल्या बहुमताचा उपयोग कलम ३७० हटवणं, नागरिकत्व सुधारणा विधेयक संमत करणं, तिहेरी तलाक कायदा हटवणं, अशा प्रकारचे जनकल्याणकारी निर्णय घेतले आहेत, असं ते म्हणाले.

काँग्रेस सरकारनं काश्मीरला अनौरस मुलाप्रमाणं वागणूक दिली, अशी टीका शहा यांनी केली. नागरिकत्व सुधारणा विधेयक हटवण्याचा काँग्रेस प्रयत्न करत असून भाजपाचा अखेरचा कार्यकर्ता असेपर्यंत आम्ही हे विधेयक हटवू देणार नाही, असं ते म्हणाले.

<><><><><>

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज परभणी जिल्ह्यात पाथरी इथं प्रचार सभेमधे बोलत होते. आम्ही जात-पात, धर्म न बघता विकास करण्यासाठी सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन रस्त्यावर उतरून कामं करत आहोत, असं ते म्हणाले .

भाजपा नेते केंद्रीय मंत्री भागवत कराड यांनी आज सकाळी परभणी शहरातून पदयात्रा काढून प्रचार केला.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची आज संध्याकाळी परभणी शहरात प्रचारसभा सुरु आहे.

**<><><><><>**

‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमाच्या उद्याच्या भागात आपण सांगली लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात या वेळेत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

बारामती लोकसभा मतदारसंघात एका अपक्ष उमेदवाराला 'तुतारी' हे चिन्ह दिल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानं केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाला तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह निवडणूक आयोगानं दिलं आहे. बारामती लोकसभा मतदार संघात या पक्षाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांना हे चिन्ह, तर दुसऱ्या एका उमेदवाराला 'तुतारी' हे चिन्ह दिल्यामुळे पक्षानं नाराजी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकांच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत येत्या गुरुवारी, २५ एप्रिल रोजी संपणार आहे. २६ एप्रिल रोजी अर्जाची छाननी होणार असून उमेदवारांना २९ एप्रिल पर्यंत अर्ज मागे घेता येईल.

राज्यातल्या **औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर** आणि शिर्डी या मतदारसंघांचा या टप्प्यात समावेश आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार निलेश लंके यांनी आज अहमदनगर मतदार संघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

**जालना** मतदारसंघातून भाजपाचे रावसाहेब दानवे यांनी आज जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. जालना लोकसभा मतदारसंघासाठी आतापर्यंत १० उमेदवारांनी १६ नामनिर्देशनपत्र दाखल केली आहेत. आज एकूण ११ जणांनी २४ नामनिर्देशन पत्रांची उचल केली.

**बीड** जिल्ह्यात लोकसभेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया आज सुरु झाली. दुपारी ३ वाजेपर्यंत १४ उमेदवारांनी ३५ अर्ज घेतले.

**<><><><><>**

नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीनं उमेदवार जाहीर केले आहेत. नाशिक लोकसभा मतदारसंघासाठी मराठा क्रांती मोर्चा चे समन्वयक करण गायकर यांना उमेदवारी दिली आहे. तर दिंडोरी लोकसभा मतदारसंघासाठी मालती थविल यांना उमेदवारी दिली आहे. दरम्यान, नाशिक लोकसभा मतदार संघात अद्याप महायुतीकडून उमेदवार घोषित झालेला नाही.

**<><><><><>**

नाशिक लोकसभा मतदारसंघातून निवडणूक न लढवण्याच्या निर्णयाबाबत फेरविचार करणार नसल्याचं नाशिकचे पालकमंत्री छगन भुजबळ स्पष्ट केलं आहे. या मतदारसंघातून भुजबळ यांनी निवडणूक लढवावी असा प्रस्ताव तीन महिन्यापूर्वीच त्यांना देण्यात आला होता. मात्र त्यानंतर महायुतीकडून उमेदवारी घोषित न झाल्यामुळे त्यांनाी गेल्या आठवड्यात उमेदवारीच्या स्पर्धेतून माघार घेत असल्याचं जाहीर केलं.

मात्र, ओबीसींचा आवाज दिल्लीमध्ये पोहोचवण्यासाठी त्यांनी या मतदारसंघातून निवडणूक लढवावी, अशी मागणी आज नाशिकमधे भुजबळ फार्म

इथं झालेल्या अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या बैठकीत करण्यात आली.

<><><><><>

सोलापूरमधले भाजपा नेते संजय क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याचा मनसुबा जाहीर केला आहे. गेल्या दहा वर्षांपासून भाजपात अपमानास्पद वागणूक मिळत असल्यानं हा निर्णय घेत असल्याचं त्यांनी सोलापुरात सांगितलं. भाजपाच्या कठीण काळात आपण  काम केलं तरी काही नेत्यांच्या दबावामुळे आपल्यावर पक्षानं अन्याय केला असं क्षीरसागर यांचं म्हणणं असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

<><><><><>

हनुमान जयंतीचा उत्सव आज देशभरात मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. विविध ठिकाणी धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. महाराष्ट्रात गावोगावी हनुमान जयंतीचा उत्सव साजरा होत आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना हनुमान जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.  पवनपुत्र हनुमान यांचं समर्पण सर्व राम भक्तांसाठी प्रेरणादायी असल्याचं त्यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. परमेश्वराच्या आशीर्वादाने विकसित भारताच्या संकल्पाला नवी ऊर्जा मिळेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे.

<><><><><>

भाजपाचे नागपूर मतदारसंघाचे उमेदवार नितीन गडकरी यांनी प्रचारासाठी शाळकरी मुलांचा वापर केल्याच्या तक्रारीची दखल घेत निवडणूक आयोगानं एन एस व्ही एम  फुलवारी शाळेच्या संचालकावर कारवाई करण्याचे निर्देश दिले, मात्र

नितीन गडकरी यांच्यावर कारवाई कधी करणार? असा सवाल प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी पत्रकाद्वारे केला आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नईमधे चेन्नई सुपरकिंग्ज आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना सुरु आहे. लखनौ सुपर जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा चेन्नई सुपरकिंग्जच्या ८ षटकात २ बाद ६६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

चीनमध्ये शांघई इथं आजपासून सुरु झालेल्या तिरंदाजी विश्व चषक स्पर्धा २०२४ मध्ये भारताच्या ज्योती सुरेखा वेण्णम हिने महिला कंपाउंड पात्रता फेरीच्या पहिल्या फेरीत दुसरा क्रमांक मिळवला. आदिती स्वामीने ७०४ गुणांसह आठवा तर परनीत कौर आणि अवनीत कौर या अनुक्रमे ७०३ आणि ६९६ गुणांसह १४ आणि २३ व्या क्रमांकावर पोचल्या. या तीन खेळाडूंमुळे भारताचा महिला चमू एकूण २११८ गुणांसह पात्रता फेरीतला सर्वोत्कृष्ट संघ ठरला.

**<><><><><>**

पालघर वगळता उर्वरित कोकणात पुढचे २-३ दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागान वर्तवली आहे. काही ठिकाणी वातावरण दमट राहील,

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**